# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

## प्रशासकीय सभा दि. १५ /०७/२०२५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :-१५० मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत. (E- २५६७४७)**

महाराष्ट्र शासनाच्या "माझी वंसुधरा अभियान ३.०" मध्ये अमृत गटामध्ये राज्यस्तरावर मिरा भाईंदर महानगरपालिकेला ३ लक्ष ते १० लक्ष लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.७.०० कोटी व भुमी थीमॅटीकमधील उच्चतम कामगिरी केल्याबाबत प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.२.०० कोटी असे एकुण रु.९.०० कोटीचे बक्षिस दि.०५/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर झाले आहे. त्यानुसार रु.९.०० कोटी बक्षिस रक्कमेचा प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन प्रशासकीय ठराव क्र.२७० दि.२९/११/२०२३ च्या मान्यतेने दि.०१/१२/२०२३ रोजी सदर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला असता दि.२३/०२/२०२४ अन्वये सदर प्रकल्प अहवाल (DPR) मधील रु.३.८८ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन उर्वरित रु.५.१८ कोटीच्या रकमेचा विनियोग मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात हरित क्षेत्र वाढीवण्यासाठी स्थानिक/देशी प्रजातीचे वृक्ष व बांबु लागवडीचा समावेश असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेस निर्देश दिलेले होते.

त्यानुसार रु.५.१८ कोटीच्या मिरा भाईंदर मनपा क्षेत्रात स्थानिक/देशी प्रजातीचे वृक्ष व बांबु लागवडीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मा. शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय ठराव क्र.१७८ दि.१९/०९/२०२४ च्या मान्यतेने दि.१४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यतेकरीता पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्यात आलेला होते.

परंतु दि.०३/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेने सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दिनांक २ मे, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत बाब निहाय चर्चा झाली. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सादर केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल शासन निर्णय क्रमांक अभियान २०२३/प्र.क्र.४६/तां.क.१ दिनांक ५ जून २०२३ मधील तरतुदी नुसार सादर केला असला तरी हरित आच्छादन वाढवण्यासाठीच्या उपाययोजनांवर होणारा खर्च प्रति वृक्ष हा फार अधिक येत असल्यामुळे याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी फेरविचार करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत विनंती करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तरी समितीच्या निर्णयानुसार याबाबत फेरविचार करून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो तांत्रिक मान्यतेसह सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार खालील प्रमाणे सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आलेला आहे.

**सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)**

| अ.क्र. | कामाचे नाव | वृक्षरोपांची संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, शाळा/महाविद्यालय, शासकीय कार्यालय/ मोकळी जागा व नागरी सोसायट्या येथे वृक्षारोपण करणे. | १५,००० नग | रु.७८,०९,२१७/- |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन १८ महिने वर्ष निगा देखभाल करणे. (५००० नग ट्रि गार्ड ची आवश्यकता आहे) | ७००० नग | रु.४,२७,२२,४७४/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांबूची लागवड करुन ०६ महिने निगा देखभाल करणे. (६६१७ नग) | १००० नग | रु.११,५२,०६०/- |
| | | **२३००० नग** | **रु.५,१६,८३,७५१/-** |

तरी उपरोक्त सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मा.शहर अभियंता यांची दि.२४/०६/२०२५ रोजी तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

सबब "माझी वसुधंरा" अभियान ३.० अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बक्षिस रक्कमेपैकी रु.५,१६,८३,७५१/- रक्कमेचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीकरीता मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्या करीता मा.प्रशासक यांच्या मान्यतेकरीता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.१०/०७/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत मा. प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

(कल्पिता पिंपळे)
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ११/०७/२०२५ वेळ ३-२५ वा.
मंजुरी क्र. १५८ २०२५/२६
११/७/२५
सचिव विभाग
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

### प्रशासकीय ठराव दि.१५/०७/२०२५ रोजी

**प्रकरण क्र. :-१५० मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत. (E- २५६७४७)**

**ठराव क्र. :-१५०**

महाराष्ट्र शासनाच्या "माझी वंसुधरा अभियान ३.०" मध्ये अमृत गटामध्ये राज्यस्तरावर मिरा भाईंदर महानगरपालिकेला ३ लक्ष ते १० लक्ष लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.७.०० कोटी व भुमी थीमॅटीकमधील उच्चतम कामगिरी केल्याबाबत प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.२.०० कोटी असे एकुण रु.९.०० कोटीचे बक्षिस दि.०५/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर झाले आहे. त्यानुसार रु.९.०० कोटी बक्षिस रक्कमेचा प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन प्रशासकीय ठराव क्र.२७० दि.२९/११/२०२३ च्या मान्यतेने दि.०१/१२/२०२३ रोजी सदर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला असता दि.२३/०२/२०२४ अन्वये सदर प्रकल्प अहवाल (DPR) मधील रु.३.८८ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन उर्वरित रु.५.१८ कोटीच्या रकमेचा विनियोग मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात हरित क्षेत्र वाढीवण्यासाठी स्थानिक/देशी प्रजातीचे वृक्ष व बांबु लागवडीचा समावेश असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेस निर्देश दिलेले होते.

त्यानुसार रु.५.१८ कोटीच्या मिरा भाईंदर मनपा क्षेत्रात स्थानिक/देशी प्रजातीचे वृक्ष व बांबु लागवडीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मा. शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय ठराव क्र.१७८ दि.१९/०९/२०२४ च्या मान्यतेने दि.१४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यतेकरीता पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्यात आलेला होते.

परंतु दि.०३/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेने सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दिनांक २ मे, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत बाब निहाय चर्चा झाली. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सादर केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल शासन निर्णय क्रमांक अभियान २०२३/प्र.क्र.४६/तां.क.१ दिनांक ५ जून २०२३ मधील तरतुदी नुसार सादर केला असला तरी हरित आच्छादन वाढवण्यासाठीच्या उपाययोजनांवर होणारा खर्च प्रति वृक्ष हा फार अधिक येत असल्यामुळे याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी फेरविचार करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत विनंती करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तरी समितीच्या निर्णयानुसार याबाबत फेरविचार करून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो तांत्रिक मान्यतेसह सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार खालील प्रमाणे सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आलेला आहे.

**सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)**

| अ.क्र. | कामाचे नाव | वृक्षरोपांची संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, शाळा/महाविद्यालय, शासकीय कार्यालय/ मोकळी जागा व नागरी सोसायट्या येथे वृक्षारोपण करणे. | १५,००० नग | रु.७८,०९,२१७/- |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन १८ महिने वर्ष निगा देखभाल करणे. (५००० नग ट्रि गार्ड ची आवश्यकता आहे) | ७००० नग | रु.४,२७,२२,४७४/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांबूची लागवड करुन ०६ महिने निगा देखभाल करणे. (६६१७ नग) | १००० नग | रु.११,५२,०६०/- |
| | | **२३००० नग** | **रु.५,१६,८३,७५१/-** |

तरी उपरोक्त सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मा.शहर अभियंता यांची दि.२४/०६/२०२५ रोजी तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

सबब "माझी वसुधंरा" अभियान ३.० अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बक्षिस रक्कमेपैकी रु.५,१६,८३,७५१/- रक्कमेचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीकरीता मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्याकरीता मा.प्रशासक यांच्या मान्यतेकरीता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.१०/०७/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अरीबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत प्रशासक यांची मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अरीबम शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम / विद्युत विभाग**

दि.१५/०७/2025

// गोषवारा //

**प्रकरण क्र. (१५१) :- नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहणेकामी खर्चास मंजुरीबाबत. (E-2149499)**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार दि.17 जुलै, 2025 रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 पुरस्कार वितरण सोहळा आयोजीत करण्यात आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस "Presidential Awardee" पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. सदर पुरस्कार वितरण कार्यक्रमास महानगरपालिकेतर्फे 10 प्रतिनिधींनी (आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र, व तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत) उपस्थित राहणेबाबत निर्देश दिले आहेत.

नवी दिल्ली येथे येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत) उपस्थित राहणार आहेत. याकरीता दि.15/07/2025 व दि.19/07/2025 या कालावधीत नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार कार्यक्रमसाठी हा सोहळा दिल्ली येथे होणार आहे. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची टिम पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित असणार आहे. दिल्ली येथे दि.16/07/2025 ते दि.18/07/2025 प्रवास करणार आहे.

केंद्रीय शहरी विकास व गृहनिर्माण मंत्रालय मार्फत संपन्न झालेल्या VC मध्ये निर्देश देण्यात आले की शहरातील सफाई कामगार यांना देखील यासाठी दिल्ली येथे आणावे. संदर्भिय पत्रानूसार मा.आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, PMU नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत उपस्थित राहणेस निर्देश दिलेले आहे.

सबब पुरस्कार सोहळा अत्यावश्यक असल्याने आणि वेळ कमी असल्याने रेल्वे प्रवासाचे आरक्षण उपलब्ध होत नसल्याने सर्व सहभागींना विमान प्रवास द्वारे दिल्ली येथे जाणे सोईस्कर आहे. या अनुषंगाने मुंबई - दिल्ली आणि दिल्ली - मुंबई प्रवास, स्थानिक प्रवास, भोजन, राहणे इ.खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे अंदाजित रू.6,50,000 खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, PMU नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, यांना विमान प्रवास अनुन्येय नसला तरी कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने विशेष बाब म्हणून विमानाने प्रवास करणे अनिवार्य आहे.

वरीलप्रमाणे नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणे कामी येणारा खर्च शासनाच्या Capacity Building, Skill Development and Knowledge Management या निधीतुन करणेस निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी, नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणे कामी येणाऱ्या अंदाजे रु.6,50,000/- खर्चाचे अग्रीम रक्कम श्री. दिपक खांबित, शहर अभियंता यांचे नावे मिळणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63(20) व 66(10) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(नितिन मुकणे)**
**कार्यकारी अभियंता (साबां/वि)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-11/25-26/DK/GO-1

मा. [illegible] ~~समिती~~ सभा
गोषवारा प्राप्त दि. १५/७/२०२५ वेळ स.११.४५वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ९६५ वर्ष २५/२६

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १५ / ०७ / २०२५

**प्रकरण क्र. ( १५१ ) :- नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 पुरस्कार वितरण सोहळयास उपस्थित राहणेकामी खर्चास मंजुरीबाबत.**

**ठराव क्र. ( १५१ )**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार दि.17 जुलै, 2025 रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 पुरस्कार वितरण सोहळा आयोजीत करण्यात आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस "Presidential Awardee" पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. सदर पुरस्कार वितरण कार्यक्रमास महानगरपालिकेतर्फे 10 प्रतिनिधींनी (आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र, व तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत) उपस्थित राहणेबाबत निर्देश दिले आहेत.

नवी दिल्ली येथे येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत) उपस्थित राहणार आहेत. याकरीता दि.15/07/2025 व दि.19/07/2025 या कालावधीत नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार कार्यक्रमसाठी हा सोहळा दिल्ली येथे होणार आहे. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची टिम पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित असणार आहे. दिल्ली येथे दि.16/07/2025 ते दि.18/07/2025 प्रवास करणार आहे.

केंद्रीय शहरी विकास व गृहनिर्माण मंत्रालय मार्फत संपन्न झालेल्या VC मध्ये निर्देश देण्यात आले की शहरातील सफाई कामगार यांना देखील यासाठी दिल्ली येथे आणावे. संदर्भिय पत्रानूसार मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उपायुक्त, शहर अभियंता, सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, PMU नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, स्वच्छ भारत उपस्थित राहणेस निर्देश दिलेले आहे.

सबब पुरस्कार सोहळा अत्यावश्यक असल्याने आणि वेळ कमी असल्याने रेल्वे प्रवासाचे आरक्षण उपलब्ध होत नसल्याने सर्व सहभागींना विमान प्रवास द्वारे दिल्ली येथे जाणे सोईस्कर आहे.या अनुषंगाने मुंबई - दिल्ली आणि दिल्ली - मुंबई प्रवास, स्थानिक प्रवास, भोजन, राहणे इ.खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे अंदाजित रू.6,50,000 खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त सहा. आयुक्त, स्वच्छता निरिक्षक, सुपरवायझर, सफाई मित्र / सफाई कामगार, व तांत्रिक सल्लागार, PMU नाविन्यता कक्षातील तांत्रिक सल्लागार, यांना विमान प्रवास अनुन्येय नसला तरी कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने विशेष बाब म्हणून विमानाने प्रवास करणे अनिवार्य आहे.

वरीलप्रमाणे नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणे कामी येणारा खर्च शासनाच्या Capacity Building, Skill Development and Knowledge Management या निधीतुन करणेस निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी, नवी दिल्ली येथे स्वच्छ सर्वेक्षण 2024 "Presidential Awardee" हा पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणे कामी येणाऱ्या अंदाजे रु.6,50,000/- खर्चाचे अग्रीम रक्कम श्री. दिपक खांबित, शहर अभियंता यांचे नावे मिळणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63(20) व 66(10) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-11/25-26/DK/PT-1